चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१६ ऑगस्ट, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# ७३ वा स्वातंत्र्य दिन पोलीस अधीक्षक कार्यालयात संपन्न

## विशेष व उल्लेखनीय कामगीरी करणाऱ्या पोलीस कर्मचारी यांचा गौरव

दिनांक १५ ऑगस्ट २०१९ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय येथे मोठया उत्साहात ७३ वा स्वातंत्र्य दिन डॉ. श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांच्या हस्ते ध्वजारोहन करून साजरा करण्यात आला. ज्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी पोलीस विभागात आपल्या सेवाकालावधीत विशेष आणि उल्लेखनीय कामगीरी केली आहे अशा अधिकारी व कर्मचारी यांना मा. पोलीस महासंचालक यांचे कार्यालयातुन प्राप्त प्रशस्तीपत्र सदर ध्वजारोहन समारंभात पोलीस विभागातील अधिकारी कर्मचारी, कार्यलयीन कर्मचारी मोठया संख्येन उपस्थित होते. मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे हस्ते पोलीस अधीक्षक कार्यालय येथील ध्वजारोहन समारंभात प्रदान करण्यात आले. तसेच नक्षलसेल चंद्रपुर येथे कार्यरत पोलीस उपनिरिक्षक श्री. धर्मेंद्र मडावी यांनी नक्षलग्रस्त भागात केलेल्या विशेष आणि उल्लेखनीय कामगीरी बद्दल पोलीस महासंचालक कार्यालय मुंबई येथील कार्यालयीन आदेशानुसार सहायक पोलीस निरिक्षक या पदावर वेगवर्धीत पदोन्नती देवुन गौरविण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपुर येथील शासकीय ध्वजारोहन समांरभामध्ये मा.ना.श्री. सुधीर मुनगंटीवार, वित्त नियोजन, वने महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा पालकमंत्री चंद्रपुर यांचे शुभ हस्ते पोलीस विभागातील ज्या पोलीस अधिकारी यांनी नक्षलग्रस्त भागात विशेष कामगीरी बजावली आहे त्यांना खरतड सेवा पदके प्रदान करण्यात आले. सदर ध्वजारोहन समारंभात पोलीस विभागातील अधिकारी कर्मचारी, कार्यलयीन कर्मचारी मोठया संख्येन उपस्थित होते.

---